**ठळक बातम्या**

- महाराष्ट्रात नव्यानं सुरू होत असलेले प्रकल्प शहरी विकासाला चालना देतील असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यासाठीची तयारी पूर्ण, उद्या मतदान होणार

- ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांना दादासाहेब फाळके जीवनगौरव पुरस्कार जाहीर

- श्रीलंकेत सार्वत्रिक निवडणुकीची घोषणा, येत्या १४ नोव्हेंबर रोजी होणार मतदान

**आणि**

- भारत आणि बांगलादेश यांच्यातल्या दुसऱ्या कसोटी सामन्याच्या चौथ्या दिवशी, आज बांगलादेशचा पहिला डाव २३३ धावांवर आटोपला

<><><><><>

महाराष्ट्रात नव्यानं सुरू होत असलेले प्रकल्प शहरी विकासाला चालना देतील तसंच लोकांचं जीवनमान सुलभ करण्यासाठी लक्षणीय भर घालतील, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्र्यांच्या हस्ते काल दूरदृश्य प्रणालीद्वारे महाराष्ट्रात ११ हजार २०० कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि लोकार्पण करण्यात आलं, त्यावेळी ते

बोलत होते. पुणे मेट्रोच्या शिवाजीनगर न्यायालय ते स्वारगेट या मार्गाचं उद्घाटन, स्वारगेट ते कात्रज या नवीन विस्तारित मार्गिकेचं आणि पुण्यातल्या भिडेवाडा इथल्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारकाचं भूमिपूजनही काल प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं.

कार्यक्रमात राज्यपाल सी. पी राधाकृष्णन दूरस्थ पद्धतीनं तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यासह अन्य मान्यवर प्रत्यक्ष उपस्थित होते.

**<><><><><>**

जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या तिसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यासाठीची तयारी पूर्ण झाली आहे. उद्या होणारं मतदान सुरळीत आणि शांततेत व्हावं यासाठी चोख सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे. या टप्प्यात उद्या ७ जिल्ह्यातल्या ४० विधानसभा मतदारसंघांसाठी मतदान होईल. ४० जागांपैकी १६ जागा काश्मीर विभागात तर २४ जागा जम्मू विभागात आहेत. या अखेरच्या टप्प्यासाठीचा प्रचार काल संध्याकाळी संपला. या टप्प्यात ३९ लाख १८ हजारांहून अधिक मतदार ४१५ उमेदवारांचं भवितव्य ठरवतील. उद्या सकाळी सात ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत मतदानाची वेळ असून ८ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होईल.

**<><><><><>**

परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर उद्या अमेरिकेत वॉशिंग्टन डीसी इथे अमेरिकेचे परराष्ट्र व्यवहार मंत्री अँटनी ब्लिंकन यांची भेट घेतील. या

भेटीदरम्यान ते युक्रेन युद्ध आणि पश्चिम आशियातल्या संकटासह अनेक जागतिक मुद्द्यांवर विस्तृत चर्चा करणार आहेत. ब्लिंकन यांच्या भेटीपूर्वी जयशंकर हे विविध क्षेत्रातल्या तज्ज्ञांशी संवाद साधतील. तसंच ते बायडन सरकारच्या कॅबिनेटमधल्या अधिकाऱ्यांचीही भेट घेतील.

<><><><><>

केंद्रीय बंदरं, वाहतूक आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी आज मुंबईत एम्प्रेस या पर्यटन जहाजावर क्रूझ भारत या अभियानाचा प्रारंभ केला. भारताला जागतिक दर्जाचं समुद्रपर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्याचा या अभियानाचा उद्देश आहे. यावेळी विविध सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या, तसंच नवनिर्मिती धोरण, विविधता आणि सर्वसमावेशकता धोरणाचा आरंभही त्यांच्या हस्ते झाला. बंदरं, वाहतूक आणि जलमार्ग राज्यमंत्री शंतनू ठाकुर, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

<><><><><>

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी जम्मू काश्मीरमध्ये प्रचारसभेत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याबद्दल केलेलं वक्तव्य अशोभनीय असल्याची टीका केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केली आहे. यातून काँग्रेस नेत्यांचा मोदींविषयीचा तिरस्कार आणि भिती दिसते असं शहा म्हणाले. मल्लिकार्जुन खरगे काल जम्मू काश्मीरमधल्या जसरोटा इथल्या प्रचारसभेला संबोधित करताना त्यांना अस्वस्थ वाटू लागलं, काही वेळ विश्राम केल्यानंतर खरगे यांनी आपलं भाषण पुन्हा सुरू केलं आणि प्रधानमंत्री मोदी यांना सत्तेवरून

खाली खेचल्याशिवाय आपण मरणार नाही असं वक्तव्य केलं होतं. यावरून शहा यांनी त्यांच्यावर टीका केली आहे.

**<><><><>**

संघटित पद्धतीने केलेल्या सायबर गुन्ह्यासंदर्भात सीबीआय अर्थात केंद्रीय अन्वेषण संस्थेने छापेमारी केली आहे. या कारवाईत देशभरातल्या २६ आरोपींना विविध शहरांतून अटक झाली आहे. यापैकी १० जणांना पुणे, ५ आरोपींना हैदराबाद तर ११ आरोपींना विशाखापट्टणममधून अटक झाली आहे. या प्रकरणी बेकायदेशीर पद्धतीने सुरू असलेल्या कॉल सेंटर्सचीही चौकशी सुरू असून आरोपींकडून विविध इलेक्ट्रॉनिक उपकरणं, मोबाईल, लॅपटॉप, आर्थिक तपशील यांच्यासह ९५१ वस्तू तसंच ५८ लाख ४५ हजार रुपये रोख रक्कम आणि तीन वाहनं जप्त करण्यात आली आहेत.

**<><><><>**

ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांना दादासाहेब फाळके हा चित्रपटसृष्टीतल्या योगदानाबद्दलचा सर्वोच्च पुरस्कार जाहीर झाला आहे. पुढच्या महिन्यात होणाऱ्या ७० व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात त्यांना हा पुरस्कार प्रदान केला जाईल. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज ही घोषणा केली. वैष्णव म्हणाले….

**होल्ड बाईट वैष्णव**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मिथुन चक्रवर्ती यांचं पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल अभिनंदन केलं आहे. मिथुन चक्रवर्ती यांना दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल आपल्याला अतिशय आनंद झाला असून यामुळे

मिथुन यांच्या चित्रपटसृष्टीतल्या योगदानाची दखल घेतली गेल्याचं प्रधानमंत्री म्हणाले. मिथुन हे सांस्कृतिक आदर्श आहेत असे गौरवोद्गारही प्रधानमंत्र्यांनी काढले.

दरम्यान, मिथुन चक्रवर्ती यांनी पुरस्काराबद्दल आनंद व्यक्त केला असून हा पुरस्कार आपले कुटुंबीय आणि चाहत्यांना अर्पण केला आहे.

**<><><><><>**

जमैकाचे प्रधानमंत्री अँड्रू होलनेस यांचं आज नवी दिल्ली इथं आगमन झालं. ते चार दिवसांच्या भारत दौऱ्यावर आले आहेत. केंद्रीय अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी त्यांचं विमानतळावर स्वागत केलं. भारताला भेट देणारे ते पहिलेच जमैकन प्रधानमंत्री आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याशी ते उद्या शिष्टमंडळ स्तरावरच्या चर्चा करतील. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू तसंच उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांची ही ते भेट घेतील. व्यापार आणि औद्योगिक क्षेत्रातील हस्तींनाही ते भेटतील. या भेटीत भारत जमैका द्विपक्षीय संबध दृढ करणारे अनेक सामंजस्य करार होण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

उत्तरप्रदेशात काल झालेल्या दोन वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला आहे.

नोएडा इथं ट्रॅक्टर आणि कारच्या अपघातात चार जणांचा मृत्यू झाला आहे. तर एक जण जखमी झाला आहे. जखमीला रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी या

मृत्यूबद्दल दुःख व्यक्त केलं असून मृतांच्या कुटुंबीयांप्रती सहवेदना व्यक्त केली आहे. याप्रकरणी ट्रॅक्टर चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, सोनभद्रमध्ये कारचालकाचं नियंत्रण सुटल्यामुळे झालेल्या अपघातात एक जणाचा मृत्यू झाला तर एक जण गंभीर जखमी झाला आहे.

<><><><><>

बिहारमध्ये सोळा जिल्ह्यांमधले चार लाख नागरिक पूरपरिस्थितीशी सामना करत आहेत कोशी, गंडक, बागमती, महानंदा आणि कमलबलान या नद्यांचं पाणी दुथडी भरुन वाहत आहेत. शेकडो गावे पुराचा सामना करत आहेत. पाऊस आणि पूरपरिस्थितीमुळे भारत-नेपाळ सीमेवरची रेल्वे सेवाही रद्द झाली आहे.

<><><><><>

तेलंगणामध्ये हैदराबाद आणि इतर भागात काल जोरदार पाऊस झाला. रामचंद्रपूरम आणि पटनचेरू इथं ५६ पूर्णांक ५ दशांश मिलीमीटर, संगारेड्डी इथं ६९ पूर्णांक ३ दशांश मिलीमीटर, ज्युबिली हिल्स इथं ३५ मिलीमीटर पावसाची नोंद झाल्याचं तेंलगणा विकास नियोजन सोसायटीने कळवलं आहे. दरम्यान, आज राज्यातल्या १७ जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

<><><><><>

श्रीलंकेत सार्वत्रिक निवडणुकांची घोषणा झाली असून येत्या १४ नोव्हेंबर रोजी या निवडणुका होणार आहेत. या निवडणुकांसाठी ४ ते ११ ऑक्टोबर दरम्यान उमेदवारी अर्ज दाखल करता येतील. श्रीलंकेचे मुख्य

निवडणूक आयुक्त सामन श्री रत्नायके यांनी प्रसारमाध्यमांना या निवडणुकीविषयी माहिती दिली. या निवडणुकीसाठी राष्ट्रपती अनुरा कुमार दिसानायके यांनी ११ अब्ज श्रीलंकन रुपयांचा निधी जारी करण्यास परवानगी दिली आहे.

<><><><><>

भारत आणि बांगलादेश यांच्यातल्या दुसऱ्या कसोटीच्या आजच्या चौथ्या दिवशी बांगलादेशाचा पहिला डाव २३३ धावांवर आटोपला. चौथ्या दिवशी बांगलादेशनं पहिल्या डावातल्या १०७ धावांवरून पुढे खेळायला सुरुवात केली होती. तत्पूर्वी, काल तिसऱ्या दिवसाचा खेळ मैदान ओलं असल्यामुळे एकही चेंडू न खेळता रद्द करावा लागला, तर दुसरा दिवस मुसळधार पावसामुळे पाण्यात गेला. दोन सामन्यांच्या या मालिकेत भारत सध्या १-० नं आघाडीवर आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या नाबाद २९ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

पेरुमध्ये लिमा इथं सुरु असलेल्या ISSF ज्युनिअर नेमबाजी विश्वचषक स्पर्धेत भारताने  दोन सुवर्ण आणि तीन कांस्य पदकांसह आपलं वर्चस्व कायम राखलं आहे. एअर रायफल प्रकारात काल गौतमी भानोत आणि अजय मलिक या भारतीय जोडीने  क्रोएशियाला १७-९ असं हरवत कांस्यपदक पटकावलं. या स्पर्धेत काल चीनने फ्रान्सला हरवून सुवर्णपदक पटकावलं.

एअर पिस्तोल संमिश्र प्रकारात लक्षिता आणि प्रमोद यांनी कनिष्का डागर आणि मुकेश नेलवाणीला १६-८ असं हरवत अजून एक कांस्यपदक पटकावलं.

**<><><><><>**

हॉकी इंडिया ज्युनिअर महिला राष्ट्रीय स्पर्धा २०२४ ला आज झारखंडमध्ये रांची इथं सुरुवात झाली. यात एकूण २६ चमू खेळणार आहेत.

//<><><><><>//